दिनांक :-28/01/२०२२

# जिल्हा खनिज प्रतिष्ठान
## जिल्हाधिकारी कार्यालय,भंडारा
## निवीदा

जिल्हा खनिज प्रतिष्ठान, जिल्हाधिकारी कार्यालय भंडारा येथील सन २०१९-२०२० व २०२०-२१ या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण कंत्राट पध्दतीने करावयाचे आहे. सदर लेखा परीक्षणाकरीता इच्छुक खालील अर्हता धारक सनदी लेखापाल यांचे कडुन अर्ज मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | पदाचे नाव | अर्हता |
|---|---|---|
| १ | सनदी लेखापाल | १. सनदी लेखापाल हा नियंत्रक व महालेखापाल, भारत सरकार यांच्या मंडळामध्ये नोंदीत असावा.<br>२. सनदी लेखापाल हा (Empancelled in CAG) राज्य व केंद्र शासनाच्या इतर विभागाचे लेखापरीक्षण केलेला असावा.<br>३. सनदी लेखापाल केंद्र व राज्य शासनाच्या काळ्या यादीत नसावे. |

अटी व शर्ती

१. सदर लेखापरीक्षण ही उद्योग ऊर्जा व कामगार विभाग यांच्याकडील शासन निर्णय दिनांक ०१ सप्टेंबर २०१६ नुसार करण्यात येत आहे.

२. अर्जदार यांना अर्जासोबत रहीवासी प्रमाणपत्र, आधारकार्ड , पॅनकार्ड जोडावे लागेल.

३. अर्जदार यांना मागील ३ वर्षातील लेखापरीक्षण केल्याचे अनुभव प्रमाणपत्र जोडावे लागेल.

४. लेखापरीक्षणाकरीता देयकाची शुल्क कमीतकमी दरानुसार राहिल.

५. सनदी लेखापालाची नियुक्ती ही उपरोक्त कालावधीकरीता मर्यादीत आहे. यामध्ये बदल करावयाचे वा रद्द करावयाचे संपूर्ण अधिकार जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष व्यवस्थापन समिती, जिल्हा खनिज प्रतिष्ठान, भंडारा यांच्याकडे राखीव ठेवलेला आहे.

६. निवीदा दिलेल्या तारखेपासुन ७ दिवसाचे आत जिल्हा खनिकर्म अधिकारी, भंडारा यांचे कार्यालयात कार्यालयीन वेळेत सर्व दस्ताऐवजासह अर्ज सादर करावे.

७. प्राप्त निवीदा उघडण्याचा दिनांक:09/02/२०२2

८. निवीदा स्विकारणे वा रद्द करण्याचा संपुर्ण अधिकार जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष व्यवस्थापन समिती, जिल्हा खनिज प्रतिष्ठान, भंडारा यांच्याकडे राखीव ठेवलेला आहे.

जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष
व्यवस्थापन समिती जि.ख.प्र.भंडारा